Kolhapur Municipal Corporation's
Yashwantrao Chavan (KMC) College Kolhapur
2032, A Ward, Dhotri Galli, Gangawesh, Kolhapur. 416012
Affiliated to Shivaji University Kolhapur

Phone No - 0231-2542085, Email Id - yckp37.cl@unishivaji.ac.in, Web site - www.yckmccollege.ac.in

जावक क्र . –

दिनांक – ०९/०७/२०२५

प्रति,
प्रा. आण्णासाहेब बाळासाहेब वसेकर
सहायक प्राध्यापक, (अर्थशास्त्र विभाग)
विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर.

**विषय:- "लोकसंख्या आणि भारतीय अर्थव्यवस्था" या विषयावरील व्याख्यानास उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणे बाबत.....**

महोदय,

आमच्या महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभागामार्फत महाविद्यालयातील विद्यार्थी व प्राध्यापकां करिता शुक्रवार, दि. ११.०७.२०२५ रोजी सकाळी ०९.०० ते ११.०० या वेळेत **"लोकसंख्या आणि भारतीय अर्थव्यवस्था"** या विषयावरील आपले व्याख्यान आयोजित केले आहे. तरी आपण या व्याख्यानाला उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे ही विनंती.

कळावे......

आपला

प्राचार्य

for प्राचार्य
यशवंतराव चव्हाण (के.एम.सी.) कॉलेज,
कोल्हापूर.

# वाढती लोकसंख्या विकासात अडथळा

## प्रा. वसेकर; 'केएमसी' कॉलेजमध्ये लोकसंख्या दिन



कोल्हापूर : यशवंतराव चव्हाण (केएमसी) कॉलेजमध्ये कार्यक्रमात बोलताना प्रा. अण्णासाहेब वसेकर.

कोल्हापूर, ता. १६ : 'विकसित राष्ट्र व्हायचे असेल, तर त्यासाठी लोकसंख्या नियंत्रण अत्यावश्यक आहे. वाढती लोकसंख्या ही विकासात अडथळा ठरू शकते,' असे मत विवेकानंद कॉलेजचे प्रा. अण्णासाहेब वसेकर यांनी व्यक्त केले. यशवंतराव चव्हाण (केएमसी) कॉलेजमध्ये अर्थशास्त्र विभागामार्फत आयोजित लोकसंख्या दिनानिमित्तच्या कार्यक्रमात ते बोलत होते.

प्रा. वसेकर म्हणाले, 'योग्य लोकसंख्या धोरणामुळे संसाधनांचा संतुलित वापर, गुणवत्तापूर्ण शिक्षण, आरोग्य आणि रोजगारामध्ये सुधारणा होऊ शकते. लोकसंख्येवर नियंत्रण ठेवूनच भारत शाश्वत आणि समृद्ध भविष्याकडे वाटचाल करू शकेल. भारत देश हा तरुणांचा देश असून, जगात सर्वात जास्त लोकसंख्येचा देश म्हणून अशी ओळख निर्माण झाली आहे. त्याप्रमाणे देशात भविष्यात प्रथम वृद्धांचा देश म्हणून ओळखला जाणार आहे.

प्राचार्य डॉ. बाबासाहेब उलपे अध्यक्षस्थानी होते. ग्रंथपाल प्रा. आर. आर. मांगले यांनी प्रास्ताविक केले. डॉ. रोहित बारसिंग यांनी परिचय करून दिला. ॲड. प्रा. डॉ. दिनकर कबीर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. समीना जमादार यांनी आभार मानले. प्रा. संदीप गावित, डॉ. अमित रेडेकर, प्रा.पी.डी.तोरस्कर, प्रा. अनिल मुंडे,

डॉ. सचिन धुर्वे, डॉ. संजय कांबळे, डॉ.बी.एम.पाटील, डॉ.जे. एम.शिवणकर, प्रा.एस.एम.शेख, प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते. सहायक प्रा. संतोष पाटील, प्रा. के. व्ही. राजपूत, प्रा. सोहेल मुजावर यांनी नियोजन केले.